0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०२/०६/२०११ रोजी प्राप्त झालेले कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४०/२०११/जा.४६१, दि.०४/०६/२०११, २३/०६/२०११, ०२/०७/२०११ व २८/०७/२०११.
३) पोलिस निरीक्षक, मालाड पोलीस स्टेशन यांचे दि.०९/०८/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४०/२०११/जा ६६५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८/०८/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ३०/०५/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी पंचासह सकाळी ठिक १०:३० वाजता डी. एस. नगर प्रवेशद्वाराजवळ, नरसींग लेन, मालाड (पूर्व), मुंबई या ठिकाणी उपस्थित राहीले. तेथून जवळच असलेल्या बिल्डींग क्र. ५ च्या जवळील पत्र्याच्या शेडमध्ये गेले असता, सदर शेडच्या दाराजवळ एक तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ उभा असून त्या टेम्पोमध्ये एक इसम २० लिटर्सचे कॅन भरत असल्याचे आढळले. सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रेमसिंग नानसिंग राजपूत असे सांगून सदर टेम्पोवर ड्रायव्हर असून निळया केरोसीन पासून थिनर बनविणे व विक्री करणे असा व्यवसाय करीत असल्याचे सांगीतले. त्यानंतर सदर पत्र्याच्या शेडमध्ये उपस्थित असलेल्या दुसऱ्या इसमास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नांव राजूसिंग देविसिंग राजपूत असे सांगून सदर टेम्पोवर ड्रायव्हर असून निळया केरोसीन पासून थिनर बनविणे व विक्री करणे असा व्यवसाय करीत असल्याचे सांगीतले.

तद्नंतर वरील नमूद टेम्पो व पत्र्याच्या शेडमधील प्लास्टीक कॅनची पाहणी केली असता, सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अनुदानित दराचे निळे केरोसीन व त्यापासून बनविलेले थिनर आढळून आले. सदर दोन्ही

इसमास निळे केरोसीन संपादन करणे, विक्री करणे किंवा शुभ्र करुन थिनर म्हणून विक्री करण्यासंबंधी परवाना/परवानगी अथर इतर कागदपत्राबाबत विचारणा केली असता, असे कोणतेही कागदपत्र नसल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच सदरचे निळे केरोसीन अनेक फेरीवाल्यांकडून रुपये २५/- प्रति लिटर या दराने थोडे-थोडे खरेदी करुन ते गरम मिठ्ठी नावाच्या रासायनिक पावडरच्या सहाय्याने सफेद करुन रुपये ३५/- प्रति लिटर या दराने थिनर म्हणून विविध हार्डवेअरच्या व रंगकाम करणाऱ्या दुकानांना भोपालसिंग फतेसिंग राजपूत यांच्या सांगण्यावरुन विक्री करीत असल्याचे सांगीतले. भोपालसिंग फतेसिंग राजपूत हा सध्या जिल्हा रासमंध, राजस्थान येथे गेला असल्याचेही सांगीतले व तसा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबधितांनी संगनमत करुन शासनाने फक्त शिधापत्रिकाधारकासाठी स्वयंपाक व दिवाबत्तीच्या कामी शिधापत्रिकेद्वारे अधिकृत शिधावाटप दुकानांतून अनुदानित दराने उपलब्ध होणारे शासन नियंत्रित निळे केरोसीन अवैधमार्गाने प्राप्त करुन, स्वतःच्या फायद्यासाठी ते रासायनिक पावडरने सफेद करुन त्याची थिनर म्हणून बेकायदेशीरित्या व विनापरवाना खरेदी, विक्री, साठवणूक व वाहतूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ (२) दि केरोसीन (रिस्ट्रीक्शन ऑन यूज ॲण्ड फिक्सेशन ऑफ सीलिंग प्रायसेस) ऑर्डर १९९३ चे कलम ३ तसेच (३) दि बॉम्बे रेशनींग एरीया श्येड्युल्ड कमोडिटीज (रेग्युलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर, १९८६ चे कलम ४, ५, ६ ,७ व ८ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द मालाड पोलिस स्टेशन, मुंबई येथे वि.स्था. गुन्हा नोंद क्र. ३४/२०११, दि.३०/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले आहेत.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टेम्पो क्रमांक एमएच-०२-एक्सए-२१९८ | १ नग | ५०,०००/- |
| २ | सदर टेम्पोमधील ६१ प्लॅस्टिक कॅनमधील निळे केरोसीनपासून बनविलेले थिनर चा साठा (२० लिटर्सचे १० कॅन, १० लिटर्सचे १० कॅन, ०५ लिटर्सचे १५ कॅन, ०२ लिटर्सचे १२ कॅन, ०१ लिटर्सचे १२ कॅन व ३० लिटर्सचे ०२ कॅन) | ४७१ लिटर | १६,४८५/- |
| ३ | बिल्डींग क्र. ५ जवळील पत्र्याच्या शेडमधील ३५ लिटर क्षमतेच्या १०६ प्लास्टीक कॅनमधील निळे केरोसीन | ३७१० लिटर | ९२,७५०/- |
| ४ | बिल्डींग क्र. ५ जवळील पत्र्याच्या शेडमधील ७५ प्लास्टीक कॅनमधील निळे केरोसीनपासून बनविलेले थिनरचा साठा | १८७५ लिटर | ६५,६२५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | बिल्डींग क्र. ५ जवळील पत्र्याच्या शेडमधील निळे केरोसीन सफेद करणारी गरम मिठ्ठी नावाची पावडर- २ बाचकी | १०० कि.ग्रॅ. | ३,०००/- |
| | | एकूण | २,२७,८६०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. २०/०६/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाहीत. तथापी, सदरची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करुन पुढील सुनावणी दिनांक २९/०६/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/०६/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता एक संधी म्हणून सदरची सुनावणी स्थगित करुन पुढील सुनावणी दिनांक ११/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०७/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहीले नाही. यास्तव, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता अंतीम संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक २६/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली. दिनांक २६/०७/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करुन पुढील सुनावणी दिनांक ०९/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस मालाड पोलिस स्टेशनचे पोलिस हवालदार श्री. सुनिल शिवाजी पवार उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

प्रस्तूत प्रकरणी आरोपी / अपचारी यांना वारंवार संधी देऊन देखील ते सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब, प्रकरण गुणवत्तेवर एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पोलिस हवालदार श्री. सुनिल शिवाजी पवार यांनी सादर केलेल्या पोलिस निरिक्षक यांचे अभिवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल हा बऱ्याच दिवसांपासून मालाड पोलिस स्टेशन येथे ठेवण्यात आला असून तो ज्वलनशिल आहे. तसेच सदरचे केरोसिन प्लास्टिक कॅनमध्ये असून सदर कॅनला इतर भादवि प्रकरणातील मुद्देमाल हाताळतांना धक्का लागल्यास, प्लास्टिक कॅन फुटण्याची तसेच आग लागण्याची शक्यता आहे. तरी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक, आरोपी तसेच अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील पोलीसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३०/०५/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या बातमीनुसार या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी पंचासह डी. एस. नगर प्रवेशद्वाराजवळ, नरसींग लेन, मालाड (पूर्व), मुंबई या ठिकाणी उपस्थित राहून तेथून जवळच असलेल्या बिल्डींग क्र. ५ च्या जवळील पत्र्याच्या शेडमध्ये गेले असता, सदर शेडच्या दाराजवळ एक तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ उभा असून त्या टेम्पोमध्ये एक इसम २० लिटर्सचे कॅन भरत असल्याचे आढळले. सदर ठिकाणी उपस्थित इसम प्रेमसिंग नानसिंग राजपूत, चालक व [illegible]सिंग देविसिंग राजपूत, चालक याचेकडे याबाबत विचारणा केली असता, निळया केरोसीन पासून थिनर बनविणे व विक्री करणे असा व्यवसाय करीत असल्याचे सांगीतले. तद्नंतर वरील नमूद टेम्पो व पत्र्याच्या शेडमधील प्लास्टीक कॅनची पाहणी केली असता, शासन अनुदानित दराचे निळे केरोसीन व त्यापासून बनविलेले थिनर आढळून आले. सदर दोन्ही इसमास यासंबंधी असलेला परवाना/परवानगी अथर इतर कागदपत्राबाबत विचारणा केली असता, असे कोणतेही कागदपत्र नसल्याचे त्यांनी सांगून सदरचे निळे केरोसीन अनेक फेरीवाल्यांकडून रुपये २५/- प्रति लिटर या दराने थोडे-थोडे खरेदी करुन ते गरम मिठ्ठी नावाच्या रासायनिक पावडरच्या सहाय्याने सफेद करुन रुपये ३५/- प्रति लिटर या दराने थिनर म्हणून विविध हार्डवेअरच्या व रंगकाम करणाऱ्या दुकानांना भोपालसिंग फतेसिंग राजपूत

यांच्या सांगण्यावरुन विक्री करीत असल्याचे सांगीतले. यावरुन सदर तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ व ३७१० लिटर निळे केरोसिनने भरलेले १०६ प्लास्टिकचे कॅन तसेच २३४६ लिटर थिनरने भरलेले १३६ प्लास्टीक कॅन जप्त करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी जप्त मुद्देमालाचे मालक, आरोपी / अपचारी यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. यावरुन आरोपी / अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तपासी पोलिस अधिकारी यांनी दिलेल्या खुलाशात, सदर गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल केरोसिन हे प्लॅस्टिक कॅनमध्ये असून बऱ्याच दिवसांपासून मालाड पोलिस स्टेशन येथे ठेवण्यात आला आहे. सदरचे केरोसीन ज्वलनशिल असून इतर मुद्देमाल हाताळतांना धक्का लागल्यास, प्लास्टिक कॅन फुटण्याची तसेच आग लागण्याची शक्यता असल्याने जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याची परवानगी मिळावी, असे नमुद केले आहे.

सदर घटनेच्यावेळी यातील आरोपी प्रेमसिंग नानसिंग राजपूत व राजूसिंग देविसिंग राजपूत यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, धंद्याचे मालक भोपालसिंग फतेसिंग राजपूत यांचेकडे ते काम करीत असून, घटनेच्या ठिकाणी ते निळ्या केरोसीन पासून थिनर बनविण्याचे काम करतात. सदर थिनर बनविण्यासाठी लागणारे निळे केरोसीन फेरीवाल्यांकडून प्रति लिटर रुपये २५/- या दराने तसेच याकामी लागणारी गरम मिट्टी पावडर खरेदी करुन व बनविलेले थिनर बाजारामध्ये हॉर्डवेअर व रंगकाम करणाऱ्या दुकानदारांना प्रतिलिटर रुपये ३५/- या दराने विक्री करत असल्याचा जबाब दिलेला आहे. तसेच घटनास्थळी शासन नियंत्रित निळे केरोसीन व थिनर बनविण्यासाठी लागणारी गरम मिट्टी पावडर तसेच जप्त टेम्पोमध्ये थिनरचा साठा आढळून आला आहे. यावरुन शासनाने अनुदानित दराने उपलब्ध करुन दिलेले नियंत्रित दराचे निळे केरोसीन अवैधमार्गाने प्राप्त करुन, स्वतःच्या फायद्यासाठी ते रासायनिक पावडरने सफेद करुन त्याची थिनर म्हणून बेकायदेशीरित्या व विनापरवाना खरेदी, विक्री, साठवणूक व वाहतूक केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, जप्त करण्यात आलेले एकूण ३७१० लिटर्स निळे केरोसिन व केरोसीन पासून बनविलेले २३४६ लिटर थिनर यांचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

जप्त तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ चे मालक यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुरेशी संधी देवून देखील ते सुनावणीस उपस्थितीत राहीले नाहीत. यावरुन टेम्पो मालक यांना सदर जप्त केलेल्या

टेम्पोबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सदरचा टेम्पो ताब्यात मिळणेबाबत कोणताही दावा टेम्पो मालकाने केलेला नाही. तसेच घटनास्थळी सदरच्या जप्त टेम्पोमध्ये केरोसीन पासून बनविलेल्या थिनरने भरलेले प्लास्टिकचे कॅन आढळून आले आहे. म्हणजेच शासन नियंत्रीत निळ्या केरोसीनपासून बनविलेल्या थिनरची साठवणूक व वाहतुक करण्यासाठी सदर टेम्पोचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, सदर जप्त करण्यात आलेला तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ हा पोलीसांनी, नियमानुसार जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मालाड पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. ३४/२०११ दि.०६/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले संपुर्ण एकूण ३७१० लिटर निळे केरोसिनचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, ग-परिमंडळ कार्यालय, ठाणे यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनजमा करावी.

३) तसेच केरोसीनपासून बनविलेला संपूर्ण एकूण २३४६ लिटर थिनरचा साठा वैध परवानाधारकास विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) जप्त करण्यात आलेला तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ या वाहनाची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले संपूर्ण एकूण २४२ प्लॅस्टिकचे रिकामी कॅन तसेच गरम मिठ्ठी नावाची पावडर - २ बाचकी (१०० कि.ग्रॅ.) याची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
१) तीन चाकी टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ चे मालक
२) टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ चे चालक, प्रेमसिंग नानसिंग राजपूत
३) टेम्पो क्र. एमएच-०२-एक्सए-२१९८ चे चालक, राजूसिंग देविसिंग राजपूत
४) भोपालसिंग फतेसिंग राजपूत
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मालाड पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मालाड पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0008